# ऋषी अगस्त्य
# नित्यपाठ–अभंग

**लेखक– अगस्ती भक्तीपरायण प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

आनंदोत्सव
**प्रकाशन मंच**

**प्रकाशक**
**चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर**
**महाराष्ट्र, भारत**



**प्रकाशक** – आनंदोत्सव प्रकाशन मंच, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड
अहमदनगर, महाराष्ट्र, ४१४००३ फोन : (०२४१) २४२४१६७, मो. ९८८१५००९४२
**प्रथम मुद्रण – (महाशिवरात्री) २०१८** **देणगीमूल्य रु. २१/–**
© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
**मुद्रक** : मळगंगा ऑफसेट, अहमदनगर
**टाईपसेटींग–लेआऊट** : कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर ९८५०२३२८९०

आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, 'आनंदोत्सव प्रकाशन मंच' केवळ सेवाभावी वृत्तीने प्रकाशन मंच उपलब्ध करून देते.

या ग्रंथाचा संपूर्ण निर्मितीखर्च अगस्त्यऋषीभक्त सौ. अलका गजानन पवार व सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे यांनी केला असून, ग्रंथाच्या सर्व प्रती श्री अगस्ती देवस्थान ट्रस्ट, अकोले, अहमदनगर यांना सप्रेम सेवा भेट म्हणून दिल्या आहेत. पुढील आवृत्त्यांचे व प्रकाशनाचे सर्व अधिकार श्री अगस्ती देवस्थान ट्रस्ट अकोले यांना देण्यात आले आहेत. मात्र अनुवादाचे वा रूपांतराचे अधिकार सौ. उषा सहस्रबुद्धे यांच्याकडे ठेवण्यात आले आहेत. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय यांशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, आनंदोत्सव प्रकाशन मंचचा वा सौ. अलका गजानन पवार यांचा कोणताही संबंध नाही.



धावपळीच्या परिस्थितीत भक्तांना निवांतपणे 'अगस्त्य महात्म्य' व 'ऋषी लोपामुद्रा चरित्र' ग्रंथ वाचणेही अवघड जाते. भक्तांच्या सोयीसाठी सतत भक्तिभाव प्रकट करता यावा म्हणून सर्व संकटमोचक अशी 'ऋषी अगस्त्य–नित्यपाठ अभंग' ही हस्तपुस्तिका साकारली आहे. त्याचा भक्तांनी लाभ घ्यावा. तसेच ह.भ.प. वारकरी, टाळकरी, भजनकरी मंडळींनी 'हरिपाठ' या नित्यपाठाबरोबर त्याच चालीत व लयीत असलेला 'ऋषी अगस्त्य नित्यपाठ' गावा आणि जीवन मार्गक्रमणासाठी बळ प्राप्त करून घ्यावे; यासाठी ही हस्तपुस्तिका साकारली आहे. ४९ अभंगांची ही पुस्तिका पाच ते सात मिनिटात गाऊन होते. म्हणूनच त्याचा लाभ अगस्त्यभक्तांनी घ्यावा.

**– अगस्त्य भक्तीपरायण प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**



**श्री ऋषी अगस्त्य**
**आणि**
**श्री ऋषी लोपामुद्रा**
**यांचे चरणी...**



नित्य स्मरा मुनी । नित्य स्मरा ऋषी ।
तपी सिद्ध योगी । अगस्त्य हा ।।१।।
प्रवरेच्या तीरी । रम्यशा आश्रमी ।
क्रिया मग्न ज्ञानी । अगस्त्य हा ।।२।।
शब्दांचा उद्गाता । चतुर्वाणी सिद्ध ।
प्रसिद्ध तामिजा । सुसंस्कृत ।।३।।



लोकांचा कैवारी । पशुपक्षी प्रेमी ।
सृष्टीचा पुजारी । अगस्त्य हा ।।४।।
महातेज शक्ती । विंध्या शिष्य करी ।
सूर्यचंद्रा क्रमी । राखितसे ।।५।।
धनुर्योद्धा भारी । आयुर्वेदाचारी ।
त्रिकालज्ञ सिद्धी । नाडी ज्ञाता ।।६।।



पत्नी लोपामुद्रे । निर्मिली नाविन्ये ।
गोत्रज उद्धरणे । अगस्त्य हा ।।७।।
वरीली कावेरी । जन हित कारी ।
दुकाळ निवारी । अगस्त्य हा ।।८।।
अग्नीवाही पुत्र । दक्षिणेचा मित्र ।
नाम दृढस्यूत । अगस्त्यांचा ।।९।।



इंद्रसखा खरा । पर्जन्य दातारा ।
कावेरी प्रवरा । धारावाही ।।१०।।
कृषी ज्ञान प्रेरी । कृषी यज्ञ करी ।
सुफलित करी । भूमीला या ।।११।।
जीवन वाहक । धारांचा प्रेरक ।
रानांचा तारक । अगस्त्य हा ।।१२।।

पशुपक्षी सारे । जलचर आवघे ।
सर्पयोनी खरे । अज्ञांकित ।।१३।।
मित्रा वरुणी पुत्र । निमित्ताला मात्र ।
विष्णू ब्रह्मा शिव । स्वये प्रकट ।।१४।।
कालकेशी मोठा । वश अहंकारा ।
लोपूनी सागरा । घातकरी ।।१५।।

९

दानवांचा नेता । लोकांचा शोषिता ।
यज्ञ याग तपा । नाश करी ।।१६।।
करावया नाश । अगस्त्य प्रकट ।
मान मान्य मांदार्य । मिरविला ।।१७।।
मानसी प्रकटून । शिवाज्ञा स्मरून ।
कुदळी घेऊन । निघे स्वामी ।।१८।।

१०

A

अहंकारी दैत्य । मारियले सर्व ।
प्राशी वरुणालय । आचमनी ।।१९।।
अहं विदारूनी । दुकाळ निवारूनी
आणिला चरणी । शूरपद्मा ।।२०।।
वातापि इल्वला । युक्ती मारियेला ।
भ्रष्टाकार केला । देशोधडी ।।२१।।

११

दुष्टांचा हा अरी । सुष्टांचा कैवारी ।
रामबाण देई । रावणारी ।।२२।।
नित्य करा ध्यान । अगस्त्य चरण ।
पाशनिवारण । मुनी करी ।।२३।।
धन दारा पुत्र । देई हा सत्वर ।
पुत्र मित्र भाग्य । दायक हा ।।२४।।

१२

संकटे भक्तांची । क्षणात निवारी ।
उद्धरूनी जाशी । त्याच्या कृपे ।।२५।।
परम सुखाचा । दर्शक मार्गाचा ।
ठेवा कैवल्याचा । अगस्त्य हा ।।२६।।
जावे त्या शरण । होऊनी अनन्य ।
आपणा उद्धरील । अगस्त्य हा ।।२७।।

१३

त्याच्या चरणी काया । निवारूनी माया ।
ठेवावी अनन्या । एकनिष्ठ ।।२८।।
प्राणी जलचरे । रक्षियेले त्याने ।
अलौकिक कारुण्ये । अगस्त्य हा ।।२९।।
त्रिदेवांचे वीर्य । योगीनींचे शौर्य ।
सामर्थ्यसंपन्न । अगस्त्य हा ।।३०।।

१५

सोमरस यांचे । पेय आवडते ।
निर्मि प्रेमभरे । यज्ञासाठी ।।३१।।
परब्रह्म सिद्ध । प्रकटे त्रिविध ।
होई एकविध । अगस्त्य रूपे ।।३२।।
अगस्त्य शिवरूप । भ्राता कार्तिकेय ।
धावे विघ्नहर्त्य । अगस्त्यां साठी ।।३३।।

१४

पार्वती निरोपिला । ब्रह्म मानियेला ।
सप्तर्षी लाभला । मान त्यासी ।।३४।।
सकल सिद्धांचा । शिरोमणी सिद्ध ।
सिद्धांत प्रसिद्ध । नाथरूपे ।।३५।।
ॐ अगस्त्यै नमः । जपावा हा मंत्र ।
प्रपंच परमार्थ । विजय पावे ।।३६।।

१६

ॐ अगस्त्यै नमः । मंत्रे करा स्नान ।
चारी मुक्ती द्वार । अगस्त्य हा ।।३७।।
सति लोपामुद्रा । लोपवूनी मुद्रा ।
अगस्त्य बढीवारा । मिरवितसे ।।३८।।
निज रूप सारे । त्रिदेव स्वरूपे ।
अद्वैती प्रकटे । अगस्त्य रूप ।।३९।।



संकल्प सोडूनी । निर्विकल्प होई ।
अगस्त्य तो करी । सफल सर्व ।।४०।।
जे जे जो जो मागे । ते ते सर्व लाभे ।
एकनिष्ठ भावे । चरणी त्यांच्या ।।४१।।
माझा एक स्वामी । कृपावंत नामी ।
लावूनी सत्कर्मी । घडवी मज ।।४२।।



सद्गुरू एक ब्रह्म । झाले शिवरूप ।
अगस्त्य एकरूप । सद्गुरू ।।४३।।
विश्वात संचार । गुरुकुले विश्वभर ।
वेदांत विचार । भेदनाशे ।।४४।।
अगस्त्य अगस्त्य । स्मरा एकचित्त ।
प्रपंचात स्वस्थ । करी सदा ।।४५।।



एक हा अगस्त्य । तपाचारी नित्य ।
होई भय मुक्त । विसंबूनी ।।४६।।
शिवरूप अगस्त्य । अगस्त्य ब्रह्मरूप ।
विष्णूरूप अगस्त्य । अद्वैती हा ।।४७।।
विसंबूनी त्याशी । नित्य कर्म करी ।
उद्धरूनी जाशी त्याच्या कृपे ।।४८।।



ॐ अगस्त्यै नमः । मंत्र असे सोपा ।
यश दे प्रपंचा । अनिल म्हणे ।।४९।।

ॐ श्री ऋषीमुनिवराय विधमहे सिद्धदेवा
यधी मही तन्नो अगस्त्य प्रचोदयात ।।
ॐ श्री भगवान अगस्ति महाराज की जय!



# ॐ श्री देव, ऋषी, मुनी, सिध्द अगस्ती महाराजांची आरती



जय देव जय देव, जय जय शिवरुपा । हो
अगस्ती मुनिवरा। तुमच्या सुक्त प्रतापे,
तुमच्या सिध्दी प्रतापे । सृष्टी सुखरुपा ।।
जय देव।। धृ।। इंद्रा मरुता तुम्ही मैत्री
घडवूनी। स्थापियले ऋतुचक्र नित्य नेमूनी।
सिध्दी अथर्वयोगे सागर प्राशुनी । देवा



रक्षियले असुरापासूनी ।।१ ।। जयदेव।।
विंध्या विनम्र करवूनी, शशिसूर्या रक्षिले।
पोथियिली गिरी बैसूनी, हिमगिरी राखिले।
तोलूनी पृथ्वीतलाशी शिवगिरिजा
बांधिले। नहुषा दंडुनी,इंद्रपद राखिले ।।२ ।।
जयदेव ।। गंगाभागिरथी आणण्या सहाय्य

करुनी। सुजला सुफला केली पूर्वोत्तर भूमी। नमविला शुरपद्म अहंकार वारुनी। दक्षिण भू सजला होई कावेरी वरुनी ।।३।। जयदेव ।। लोपामुद्रा वरुनी गोत्रज तारिले। वातापि पचवूनि पुरुषार्था दाविले। धनुर्विद्या योजुनि सत्या राखिले।



अथर्वविद्येयोगे, आरोग्या रक्षिले ।।४।। जयदेव ।। अमृतसरिता, गौतमी, गोदा पवित्रा। ताम्रपर्णी निर्मुनी दावी कौतुका। अद्वैतामृत वर्षुनी जागवी शिवतत्त्वा। दंडुनि मनमय दैत्या, रक्षिसी जीवमात्रा ।।५।। जयदेव ।। अतिउग्रा आणि उदारा तू



योगीराणा। जाणूनी भाव मनींचा दे प्रसाद कृपा। तव शक्ती प्रतापे देशी, जल, दारा,पुत्रा। पशुधन कृषीधन रक्षिसी। रक्षिसी तव दासा ।।६।। जयदेव ।। अगस्त्यपुरी राहसी चिर सूक्ष्म रुपी। राखिसी समस्त विश्वा दुरिते वारुनी। आलो चरणा



शरणा अनन्यभावानी। त्राही विनवी अनिल। मनिषा पुरवूनी ।।७।। जयदेव ।।

ॐ ऋषीमुनीवराय विद्महे सिध्ददेवाय
धिमही तन्नो अगस्त्य प्रचोदयात ।



## आरती – लोपामुद्रा देवींची



जय देवी जय देवी जय अगस्त्यकांते । लोपामुद्रा नामे जीववीशी बालके ।।धृ।। जय देवी ।। महाशक्ती त्रिदेवी तवरुपे होती । अगस्त्य प्रकटवी तुते जीवे अद्वैती । वेदी प्रकटे तुझी दिव्याद्भूत वाणी । अशुभ हरिणी तू गं विद्या रक्षिणी ।।१।। जयदेवी ।। प्रकृतिरुपा तू गं सरितांची जननी । प्राणीमात्रा



राखिशी तू कृपा नयनी । वरप्रदा अग्नीदिव्या तू कौशितकी । यज्ञयोगिनी माता तू विद्यासाम्राज्ञी ।।२।। जयदेवी ।। हजार वरुषे वाढवी पुत्रा तू उदरी । इध्मवाही दृढस्यूत माता तू गं अग्नाई । तव प्रसादे चाले यज्ञ निशीदिनी । समस्त विद्या होती सुफलित आश्रमी ।।३।। जयदेवी ।। बालक आम्ही



सारे ऋषीमुनींचे दास । अंकी घेऊन आम्हा सांभाळी नित्य । विदर्भकन्या मिरविशी जगताची जननी । व्हावे वरदायिनी तू गं अनिल तव चरणी ।।४।। जयदेवी ।।

।। ॐ अगस्त्यकांताय विधमहे मातृशक्ती यधीमही
तन्नो लोपामुद्रा प्रचोदयात ।।

ॐ श्री लोपामुद्रामाता की जय !